**इतर फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३७२/२०१७ मधील**
**निशाणी क्र.५ खालील आदेश**
( मनिषा देवकर वि. संतोष देवकर व इतर )

**१.** अर्जदाराने मुळ अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करणारा कायदा, कलम २३ अन्वये दाखल केलेला आहे. अर्जदाराने सदर अर्जासोबत अर्ज नि.क्र.५ दाखल करून, जाबदेणार यांच्याकडून तिचे उदरनिर्वाहाकरिता अंतरिम पोटगी दरमहा रक्कम रूपये ५,०००/— मिळण्याची विनंती केली आहे.

**२.** अर्जातील कथन की, जाबदेणार क्र.१ हा अर्जदाराचा पती असून, इतर जाबदेणार हे जाबदेणार क्र.१ चे नातेवाईक आहेत. अर्जदार ही जाबदेणार यांच्याकडे नांदत असताना त्यांनी तिचेकडे बेकायदेशीररित्या रक्कम रूपये २,००,०००/— ची मागणी करून त्यापोटी तिचा शारीरिक व मानसिक छळ केला आणि तिच्यावर कौटुंबिक स्वरूपाचे अत्याचार केले.

**३.** पुढे असे कथन केले की, जाबदेणार यांनी अर्जदारास नांदविणेस नकार देवून, दिनांक २६/०७/२०१७ रोजी तिला माहेरी हाकलून दिले. अर्जदारास उत्पन्नाचे साधन नसून, ती स्वत:चा सांभाळ करणेस असमर्थ आहे. याउलट मौजे बाभुळगाव, ता. इंदापूर येथे जाबदेणार यांची एकत्र कुटूंबाची बागायती शेती असून, त्यापासून त्यांना वार्षिक रूपये २५,००,०००/— चे उत्पन्न मिळत आहे. प्रस्तुत मुळ अर्जाचा निकाल होण्यास बराच कालावधी लागणार आहे. अर्जदारास तिचे उदरनिर्वाह व न्यायालयीन खर्चासाठी अंतरिम पोटगी दरमहा रूपये ५,०००/— मंजूर व्हावी, अशी विनंती केली आहे.

**४.** जाबदेणार यांनी नि.क्र.१० अन्वये त्यांचे लेखी म्हणणे दाखल करून त्यांचे नातेसंबंध वगळता, इतर सर्व मजकुर फेटाळुन लावलेला आहे. त्यांचे कथन की, त्यांनी अर्जदाराकडे कधीही बेकायदेशीररित्या रूपये २,००,०००/— ची मागणी करून त्यापोटी तिचा शारीरिक व मानसिक छळ केला नव्हता व नाही. अर्जदार ही कोणतेही संयुक्तिक कारण नसताना जाबदेणार क्र.१ ची साथ सोडून स्वेच्छेने तिचे माहेरी निघून गेली आहे. अर्जदारावर जाबदेणार यांच्याकडून कधीही कौटुंबिक

स्वरूपाचे अत्याचार झाले नाहीत. त्यामुळे, अर्जदारास पोटगी मागण्याचा अधिकार प्राप्त नाही. पुढे असे कथन केले की, अर्जदाराचा स्वत:चा शिवणकाम करण्याचा व्यवसाय असून, या व्यतिरिक्त ती घरगुती ब्युटी पार्लरचा व्यवसाय चालवित आहे. सदर दोन्ही व्यवसायापासून तिला दरमहा रक्कम रूपये ३०,०००/— चे उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे, अर्जदार ही जाबदेणार यांचेवर अवलंबून आहे, असे म्हणता येणार नाही. तरी, सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

**५.** अर्जदार व जाबदेणार यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

**६.** अर्जदार व जाबदेणार यांचे लेखी कथन व दाखल कागदपत्रांचा विचार करता, खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झालेले आहेत, त्यांचे निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| **अ.क.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| (१) | अर्जदार अंतरीम पोटगी रक्कम रू.५,०००/— मिळणेस पात्र आहे काय? | अंशत: होकारार्थी. |
| (२) | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करिता</u> :**

**७.** अर्जदाराने प्रस्तुत अर्जातील कथनाच्या पुष्टयार्थ तिचे शपथपत्र दाखल केले आहे. वर नमुद कायदयातील कलम २३ अन्वये अंतरीम आदेश पारीत करणेकामी अर्जदाराने तसा प्रथमदर्शनी पुरावा न्यायालयात सादर करणे आवश्यक आहे. उभय पक्षांच्या कथनावरून असे दिसून येते की, अर्जदार व जाबदेणार क्र.१ यांचे वैवाहिक नाते अद्याप अस्तित्वात आहेत. पुढे अर्जदाराच्या शपथपत्रातील कथनावरून सकृतदर्शनी असे दिसून येते की, जाबदेणार क्र.१ याने अर्जदारास नांदविण्यास नकार देवून तिला निष्काळजीपणाने माहेरी सोडून दिले आहे. पुढे प्रथमदर्शनी असेही दिसून येते की, जाबदेणार क्र.१ याने अर्जदार हिस नांदविण्याचे

प्रामाणिक प्रयत्न केलेले नाहीत. निश्चितच जाबदेणार क्र.१ याने अर्जदारास वैवाहिक सुखापासून वंचित ठेवून, तिचा मानसिक छळ केलेला आहे, हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. पुढे प्रथमदर्शनी असेही दिसून येते की, अर्जदारास उत्पन्नाचे साधन नसून, ती स्वतःचा सांभाळ करणेस असमर्थ आहे. याउलट अर्जदाराने दाखल केलेले शेतजमिनीचे उता—यांचे अवलोकन केले असता जाबदेणार यांना मौजे बाभुळगाव, ता. इंदापूर येथे बागायती शेतजमीन असून, त्यापासून त्यांना पुरेसे उत्पन्न मिळत आहे. सबब, अर्जदारास अंतरिम पोटगी मागण्याचा अधिकार प्राप्त होत आहे.

८. मुळ अर्जाची चौकशी होवून न्यायनिर्णय लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. अशा परिस्थितीत अर्जदारास अंतरीम पोटगी मंजूर करणे न्यायाचे अनुसरून होणार आहे. जाबदेणार क्र.१ याच्या उत्पन्नाचा विचार करता, अर्जदारांस तिचे उदरनिर्वाह व औषधोपचाराकरिता दरमहा रक्कम रूपये २,०००/— अंतरीम पोटगी प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ करिताचा निष्कर्ष अंशतः होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.२ करिताच्या निष्कषार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१.** जाबदेणार क्र.१ यास असे आदेशीत करण्यात येते की, त्याने अर्जदारास अंतरीम पोटगी दरमहा रक्कम रूपये २,०००/— (रूपये दोन हजार मात्र) प्रस्तूत अर्ज दाखल तारखेपासून मूळ अर्जाच्या निकालापावेतो दयावेत.

**२.** सदर आदेशाची प्रत अर्जदार व जाबदेणार यांना विनाशुल्क देण्यात यावी.

**३.** प्रस्तुत आदेशाची प्रत संबंधित पोलिस ठाण्यास माहितीस्तव पाठविण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयामध्ये घोषीत करण्यात आला.)

स्वाक्षरित/—
**(अ.अ.शेख)**
दिनांक : १५/१२/२०१७ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापुर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file order are same, word to word, as per the original order

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | : | A.P.Hipparagi, |
| Court | : | CJJD & JMFC, Indapur. |
| Date | : | 15/12/2017. |
| Order signed by the presiding officer on | : | 15/12/2017. |
| Order uploaded on | : | 16/12/2017. |